**राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण**

**परिषद, महाराष्ट्र, पुणे.**

नवोपक्रम स्पर्धा सन २०२२ -२३

(प्राथमिक शिक्षक गट)

# नवोपक्रमाचे नाव “ माझी भाकरी ”


स्पर्धकाचे नांव

**श्री. भक्तराज मनसुख गर्जे**

B.A. D.Ed.

9834127980

E-mail - brajgarje@gmail.com

जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुलाळवाडी
ता जत जिल्हा सांगली

[ U-DISE CODE- २७३५०२०७४०१ ]

## स्पर्धकाची माहिती

| | |
|---|---|
| स्पर्धकाचे नांव (मराठी) | : श्री. भक्तराज मनसुख गर्जे |
| स्पर्धकाचे नांव (इंग्रजी) | : Mr. Bhaktaraj Mansukh Garje |
| मोबाईल नंबर | : 9834127980, |
| ई-मेल आयडी | : brajgarje@gmail.com |
| हद्दा | : सहा. शिक्षिका (Asst. Teacher) |
| युडायस नंबर | : २७३५०२०७४०१ |
| शाळेचे नांव | : जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कुलाळवाडी ता.जत जि. सांगली |
| शैक्षणिक अर्हता | : B.A. D.Ed. |
| नवोपक्रम शिर्षक | : माझी भाकरी |
| मार्गदर्शक | : डॉ. राजेंद्र भोई |

वरीष्ठ अधिव्याख्याता, जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था,

DIET, सांगली.

# अनुक्रमणिका


| अ.क्र. | तपशील | पान. क्र. |
|---|---|---|
| १. | स्पर्धकाचे प्रतिज्ञापत्र | ४ |
| २. | प्रमाणपत्र | ४ |
| ३. | प्रस्तावना | ५ |
| ४. | नवोपक्रमाची गरज व महत्व | ७ |
| ५. | नवोपक्रमाची उदिष्टे | ८ |
| ६. | नवोपक्रमाचे नियोजन | ९ |
| ७. | नवोपक्रमाची कार्यपद्धती | १३ |
| ८. | नवोपक्रमाची यशस्विता /फल निष्पत्ती | २० |
| ९. | समारोप | २२ |
| १०. | संदर्भ सूची | २३ |
| ११. | परिशिष्टे | २४ |

## प्रतिज्ञापत्र

मी श्री/श्रीमती/डॉ. भवतराज मनसुख जाँ प्रतिज्ञापत्र लिहून देतो/देते की, या नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला माझी भाकरी

..........................................................................................................

हा नवोपक्रम माझ्या स्वत:च्या शैक्षणिक उपक्रमांवर, अनुभवावर आधारित आहे. हा नवोपक्रम मला स्वत:ला सुचलेला आहे, काल्पनिक नाही. तसेच भारतीय अथवा विदेशी लेखकांच्या ग्रंथातील अथवा संशोधनातील माहितीच्या आधारे हा नवोपक्रम लिहिलेला नसून यामध्ये मला जाणवलेल्या समस्येचा सूक्ष्म अभ्यास करण्याचा मी प्रयत्न केलेला आहे. हा नवोपक्रम यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही. तसेच इतर कोणत्याही व्यक्तीकडून लिहून घेऊन तो मी माझ्या नावावर सादर केलेला नाही. तसे आढळून आल्यास तो Copyright Act १९५७ खाली दाखलपात्र गुन्हा आहे याची मला कल्पना आहे.

दिनांक : १८/११/2022

स्थळ : कुलाळवाडी

स्पर्धकाची स्वाक्षरी

नाव श्री. भवतराज म. जाँ

शाळेचा /कार्यालयाचा शिक्का.

जि.प. प्राथ. मराठी शाळा कुलाळवाडी (अंक) ता. जत, जि. सांगली
स्थापना दि. १९६९
UIDSE NO. 27350207401

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, श्री/श्रीमती/डॉ. भवतराज मनसुख जाँ हे माझ्या शाळेत / कार्यालयात कार्यरत असून त्यांनी सादर केलेला माझी भाकरी

..........................................................................................................

हा नवोपक्रम शैक्षणिक वर्ष 2021-22 मध्ये त्यांनी स्वत: राबविलेला असून ती त्यांच्या स्व परिश्रमाची फलश्रुती आहे. हा नवोपक्रम त्यांनी राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद, महाराष्ट्र, पुणे मार्फत आयोजित यापूर्वीच्या राज्यस्तरीय नवोपक्रम स्पर्धेसाठी सादर केलेला नाही.

दिनांक : १८/११/2022

स्थळ : कुलाळवाडी

शाळा/ कार्यालय प्रमुखाची स्वाक्षरी

नाव श्री. अप्पासो भिमाप्पा कळाडी

शिक्का: मुख्याध्यापक
जि.प.प्राथ.मराठी शाळा कुलाळवाडी
(अंक )ता.जत जि सांगली

Scanned by CamScanner

# प्रस्तावना

पालकांचे रोजगाराच्या शोधात होणारे स्थलांतर, त्यामुळे विद्यार्थ्यांची शाळेतील गळती ही गुणवत्तापूर्ण शिक्षणातील फार मोठी समस्या आहे हे आपण सर्वच जाणतो. पर्जन्यछायेच्या प्रदेशातील जत तालुक्यात कुलाळवाडी हे २२६ कुटुंबांचे गाव, त्यापैकी 170 हून अधिक कुटुंबं प्रतिवर्षी ऑक्टोंबर ते एप्रिल महिन्यात ऊसतोडणीसाठी स्थलांतरित होतात. त्यामुळे शाळेतील विद्यार्थ्यांनाही पालकांसमवेत स्थलांतरित व्हावे लागे. याचे विद्यार्थ्यांच्या उपस्थितीवर विशेषतः द्वितीय सत्रात गंभीर परिणाम होत असत. ही एक शैक्षणिक समस्याच नव्हती तर तिला  इतर आयामही होते. अनुपस्थितीमुळे मुलांच्या शिक्षणात खंड पडत होता त्यामुळे परतल्यावर काही मुलांचं अभ्यासात लक्षच लागत नव्हते परिणामी काही मुलं शालाबाह्य ही होत होती. तसेच स्थलांतराच्या जागी मुलांची नीट देखभाल होत नसे, जेवणाखाण्याची ही नीट सोय नसे, परिणामी ती कुपोषणाची शिकार ही होता होती.माझ्या शाळेची पटसंख्या 210 पर्यंत पोहोचली होती परंतु द्वितीय सत्रात म्हणजेच पालकांच्या स्थलांतरानंतर शाळेत 140 हून कमी विद्यार्थी उपस्थित असायचे.

मला तात्पुरता उपाय, जसं की वाडीतल्याच एखाद्या बाईला मुलांना दररोज पोळी भाजी करून देण्याचं काम देणं नको होतं कारण त्याचा खर्च पालकांना परवडला नसता आणि तो कायमस्वरूपी उपायही नव्हता.या समस्येवर अधिक विचार करत असताना मला एक कल्पना सुचली की जर विद्यार्थी विशेषत: मुलगे स्वतःच स्वयंपाक बनवायला शिकले तर या समस्येवर तोडगा निघून शकेल.

आपल्या पुरुष प्रधान समाजात स्वयंपाक करणे ही केवळ महिलांचीच जबाबदारी समजली जाते त्यामुळे मुलग्याने स्वयंपाक आणि त्यातही भाकरी बनवायला शिकणे ही सहज पचनी न पडणारी कल्पना होती. त्यावर मात कशी करायची? मला वाटलं की फक्त पालकांचं आणि विद्यार्थ्यांचं प्रबोधन पुरेसं होणार नाही. त्याच्या जोडीला आणखी काहीतरी हवं. तिला स्पर्धेचे रूप दिलं तर? मुलांना स्पर्धा आवडते. स्पर्धा म्हटलं की सर्वांच्याच मनात उत्सुकता आणि जिंकण्याची उमेद निर्माण होते. म्हणून याला स्पर्धेचे स्वरूप देत हे कौशल्य मुलांमध्ये रुजविण्याचा निर्णय घेतला, आणि 2021 -22 मधे मुलांसाठी माझी भाकरी उपक्रम वजा स्पर्धा घेतली.

राष्ट्रीय सणांपूर्वी शाळेत भाकरी बनविण्याच्या स्पर्धेचे आयोजन सुरू केले. स्वच्छता, साहित्याची हाताळणी, नीटनेटकेपणा, आकार आणि चव या निकषांवर 50 गुणांचे मूल्यांकन करून इयत्ता तिसरी ते आठवी मधील प्रथम तीन क्रमांकाच्या मुलांना राष्ट्रीय सणांच्या दिवशी मान्यवरांच्या हस्ते बक्षिसे  देण्याचे नियोजन केले.

बीबीसी न्यूज, साम टीव्ही, एबीपी माझा, ब्रूट इंडिया, द प्रिंट , लोकसत्ता, महाराष्ट्र टाइम्स ,लोकमत पुढारी, दिव्य मराठी इत्यादी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय माध्यमांमध्ये या उपक्रमाच्या परिणामकारकतेची दखल घेण्यात आली आहे. आपल्याला काही वेगळं करता येतं आणि त्याचं कौतुकही होतं आहे हे बघितल्यावर मुलंही नवीन आव्हानांना भिडायला उत्सुक आहेत.

**विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबवून** त्यांची **उपस्थिती टिकवत शैक्षणिक गुणवत्ता** वाढविण्याच्या उद्देशाने हा उपक्रम हाती घेतला.

# नवोपक्रमाची गरज व महत्व

**नवोपक्रमाची गरज:**

विद्यार्थी हा शाळेचा केंद्रबिंदू तर विद्यार्थ्यांची उपस्थिती हा शाळेचा आत्मा म्हणल तर वावगं ठरणार नाही. पालकांच्या ऊसतोडीच्या व्यवसायामुळे विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर हंगामी स्थलांतर होत असे. विद्यार्थ्यांना दीर्घकाळ घरापासून दूर भटकंतीचे जीवन जगावे लागायचे. या काळात त्यांना सुरक्षित निवारा मिळत नसे. त्यामुळे ऊन, वारा, थंडीत त्यांच्या आरोग्याच्या समस्या निर्माण होत असत. तसेच आई-वडिलांच्या धावपळीच्या कामामुळे त्यांना वेळेवर जेवण न मिळाल्याने कुपोषण व्हायचे. अनेकदा आई-वडिलांना मदत किंवा आर्थिक हातभार लावण्यासाठी हे विद्यार्थी बालमजुरी देखील करत असत. सर्वात दुःखदायी म्हणजे विद्यार्थी शाळेत गैरहजर आणि त्यामुळे गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहायचे. अनेक पालक पाल्यांचा सांभाळ होत नसल्याकारणाने बालविवाह लावून देत. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे शाळेत शैक्षणिक व सह शैक्षणिक उपक्रम राबवितांना अडचणी यायच्या.

**नवोपक्रमाची महत्व:**

माझी भाकरी मुळे पालकांपाठोपाठ होणारे विद्यार्थ्यांचे स्थलांतर पूर्णपणे थांबणार आहे. भटकंती थांबून विद्यार्थ्यांना स्थैर्य व त्यामुळे स्व विकासासाठी वेळही मिळेल. घरातील सुरक्षित वातावरण विद्यार्थ्यांना लाभेल व आरोग्याच्या समस्याही निर्माण होणार नाहीत. याच बरोबरीने कुपोषण, बालमजुरी, बालविवाह या समस्यांवर देखील तोडगा मिळणार आहे. सर्वात महत्त्वाचं म्हणजे विद्यार्थ्यांची उपस्थिती नियमित होऊन त्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण मिळेल व त्यातून त्यांचा सर्वांगीण विकास साधता येईल.

**नवोपक्रमाचे वेगळेपण**

स्वावलंबन हा आत्मविश्वासाचा कणा आणि आत्मविश्वास हे यशाचे रहस्य आहे. बालवयातच विद्यार्थी त्यांच्या क्षमतेनुसार कौशल्ये विकसित करत स्वावलंबी झाल्यास त्यांचा आत्मविश्वास उंचावून त्यांना शिक्षणाची व ज्ञानाची गोडी निर्माण होईल. 'माझी भाकरी' विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनवेल, आत्मविश्वास निर्माण करून, कठीण परिस्थितीतही यशस्वी होण्याची वृत्ती विद्यार्थ्यांच्या अंगी रुजवेल.

# नवोपक्रमाची उद्दिष्टे

माझ्या नवोपक्रमाची उद्दिष्टे खालील प्रमाणे आहेत:

१) स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचा शोध घेणे.

२) विद्यार्थ्यांच्या समस्यांवर उपाययोजनांसाठी उपक्रमांची निर्मिती करणे.

३) विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे.

४) विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबवून त्यांची शाळेतील उपस्थिती वाढविणे.

५) विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे.

# नवोपक्रमाची नियोजन व कार्यवाही

मी माझ्या नवपक्रमाचे नियोजन व कार्यवाही पुढील प्रमाणे केले होते:

**१. उपक्रम पूर्वस्थितीचे निरीक्षण**

पूर्वी बहुतांश पालक ऊस तोडीसाठी हंगामी स्थलांतरित होताना, स्वतःच्या पाल्यांना अर्थात शाळेतील विद्यार्थ्यांना सोबत घेऊन जात. विद्यार्थ्यांना कुलाळवाडीतच घरी ठेवण्याचा कुठलाही मार्ग नव्हता. वयोवृद्ध आजी आजोबांना विद्यार्थ्यांचा सांभाळ करणे शक्य होत नसायचे. सततच्या स्थलांतरामुळे पालक विद्यार्थ्यांना कुठल्याच शाळेत पाठवू शकत नव्हते. सुरक्षित निवारा नसल्याने विद्यार्थ्यांना उसाच्या फडात किंवा मोकळया मैदानातच निवास करावा लागायचा. परिणाम स्वरूप सर्दी, खोकला, ताप तसेच मलेरिया, डेंगू इत्यादी कारणाने विद्यार्थी आजारी असायचे. भटकंतीमुळे विद्यार्थ्यांना वेळेवर उपचार देखील मिळायचे नाहीत. वेळी अवेळीच्या कामामुळे पालक विद्यार्थ्यांच्या आहाराकडे लक्ष देऊ शकत नसायचे व त्यामुळे त्यांचे कुपोषण व्हायचे. अनेकदा त्यांना पालकांच्या बरोबरीने मजुरी करावी लागायची. तर काही पालक बालवयातच मुलींची लग्न लावून देत असत. विद्यार्थ्यांच्या उपस्थितीत आणि त्यातून अध्ययनात फार मोठा खंड पडत असे. अनेक विद्यार्थी शाळाबाह्य होऊन गुणवत्तापूर्ण शिक्षणापासून वंचित राहत. सत्तरहून अधिक विद्यार्थी स्थलांतरित व्हायचे आणि शिक्षणापासून वंचित राहायचे. यामागील प्रमुख कारण होते 'भाकरीची' सोय.

**2. संबंधित व्यक्ती आणि तज्ञांशी चर्चा**

विद्यार्थ्यांचे पालकांसोबत होणारे स्थलांतर त्यांना भाकरी बनवायला शिकवून थांबविण्याचा निश्चय केल्यानंतर, त्यासाठी काय करावे लागेल? कोणत्या पद्धतीने कौशल्ये विकसित करावी लागतील? अडथळे आणि अडचणी कोणत्या येऊ शकतील? याचचबरोबरीने पालकांना विश्वासात घेणेदेखील आवश्यक होते. यासाठी शाळेचे मुख्याध्यापक श्री. कबाडगे सर, माझे सहकारी शिक्षक बांधव, सांगली डायटचे अधिव्याख्याता श्री.भोई सर ,गावचे माजी सरपंच श्री. बजरंग कुलाळ, अनिवासी भारतीय ( अमेरिका) शिक्षणप्रेमी श्री. सचिन मिरजकर , पालक श्री. काशिनाथ धडस, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष श्री. शिवाजी तांबे , माझी आई सौ. सुनिता गर्जे , सामाजिक संस्था युथ फॉर जत यांच्याशी चर्चा केली व वेळोवेळी मार्गदर्शन ही घेतले.

## ३. आवश्यक साधनांचा विचार

विद्यार्थ्यांमध्ये भाकरी बनवायला शिकण्याचे कौशल्य विकसित करत असताना लागणारे साहित्य कसे उपलब्ध होईल? कोणती दक्षता घ्यावी लागेल? विद्यार्थ्यांच्या शिकण्यात सातत्य कसे ठेवता येईल? खर्च किती येईल? वेळेचे नियोजन कसे करावे? प्रशिक्षणाचे ठिकाण कोणते असावे? विद्यार्थ्यांना प्रेरणा व मार्गदर्शन कसे लाभेल? माता पालकांचा सहभाग कसा मिळेल? अडथळे काय येतील? स्पर्धेच्या दिवशी साहित्याची व्यवस्था कशी करावी? मूल्यमापनासाठी कोणत्या बाबी ध्यानात घ्याव्यात? इत्यादी बाबींचा विचार केला होता.

## ४. करावयाच्या कृतींचा क्रम

विद्यार्थ्यांना भाकरी बनवायला शिकवून त्यांचे स्थलांतर थांबविण्याचा निश्चय केल्यानंतर,सर्वप्रथम पालक सभा घेऊन पालकांना माझी भाकरी उपक्रमाविषयी अवगत केले. त्यांच्याकडून अपेक्षित असलेले सहकार्य मिळण्यासाठी विनंती केली. घरोघरी जाऊन पालकांच्या विशेषत: माता पालकांच्या भेटी घेतल्या. त्यांना संवादातून शिक्षणाचे महत्त्व पटवून दिले. विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे होणारे शैक्षणिक नुकसान त्यांच्या निदर्शनास आणून दिले. मुले भाकरी बनवायला कसे शिकतील याबद्दल त्यांच्या मनात विविध शंका होत्या. मुलगा मुलगी समान असून निसर्गाने दोघांनाही सारख्याच क्षमता दिल्या आहेत याची जाणीव त्यांना करून दिली. याद्वारे त्यांची मुलांना भाकरी बनवायला शिकविण्याची मानसिकता तयार झाली. त्यानंतर पुढील प्रमाणे उपक्रम निश्चित केले,

४.१) विद्यार्थ्यांना घरात स्वयंपाकावेळी जवळ बसून निरीक्षण करण्यास सांगितले.
४.२) भाकरी बनविण्याचे व्हिडिओ विद्यार्थ्यांना दाखविले.
४.३) सरावासाठी शेणापासून गवऱ्या थपण्याचे सुचविले.
४.४) भाकरी बनविण्याची प्रात्याक्षिके शाळेमध्ये घेतली.
४.५)घरात नियमित सराव करणाऱ्या विद्यार्थ्यांचे कौतुक केले.
४.६) विद्यार्थ्यांनी घरी बनविलेल्या भाकरींचे प्रदर्शन शाळेत ठेवले.
४.७) भाकरी बनविण्याची स्पर्धा व बक्षिसांची घोषणा केली.
४.८) भाकरीच्या मूल्यमापनाची पद्धत विद्यार्थ्यांना समजावून सांगितली.
४.९) चुल, तवा, पीठ इत्यादी साहित्य शाळेत उपलब्ध केले.
४.१०) स्पर्धेच्या दिवशी पालक व गावातील मान्यवर व्यक्तींना शाळेत आमंत्रित केले.
४.११) मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण केले.

## ५. उपक्रमोत्तर स्थितीचे निरीक्षण

उपक्रमाचे सकारात्मक परिणाम स्पर्धा पार पडल्यानंतर प्रकर्षाने निदर्शनास आले. विद्यार्थ्यांचे स्थलांतर 0% पर्यंत खाली आले, वर्षभर 95 टक्के उपस्थिती शाळेत नोंदविली गेली, विद्यार्थ्यांमधला आत्मविश्वास दुणावला, गुणवत्तेत लक्षणीय वाढ झाली, स्त्री - पुरुष समानता , समस्या निराकरण, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा इत्यादी मूल्यांची जोपासना विद्यार्थ्यांच्या वर्तनात दिसू लागली, विद्यार्थी जबाबदारीने वागू लागले आणि त्यांच्यामध्ये स्वयंशिस्त विकसित झाली.

## ६. कार्यवाहीचे टप्पे

| अ.क्र. | दिनांक | उपक्रम | सहभागी घटक |
|---|---|---|---|
| १. | १५/०६/२०२१ ते ३०/०६/२०२१ | समस्याशोध, प्रश्नावली, पालक भेटी | पालक व विध्यार्थी |
| २. | १५/०७/२०२१ | पालक सभा | पालक, सरपंच, शा.व्य.समिती |
| ३. | १७/०७/२०२१ ते ३१/०७/२०२१ | संबधित व्यक्ती व तज्ञांशी चर्चा | शिक्षक, तज्ञ मार्गदर्शक सामाजिक संस्था |
| ४. | २०/०८/२०२१ ते १०/०९/२०२१ | विद्यार्थांची पूर्व तयारी | विद्यार्थी , पालक, शिक्षक |
| ५. | १५/०९/२०२१ | माझी भाकरी स्पर्धेची घोषणा | विद्यार्थी व सामाजिक संस्था |
| ६. | ०१/१०/२०२१ | विद्यार्थांची शैक्षणिक पूर्व चाचणी | स्थलांतरीत होणारे विद्यार्थी |
| ७. | १२/१०/२०२१ | माझी भाकरी स्पर्धा | विद्यार्थी व शिक्षक |
| ८. | १८/०१/२०२२ | माझी भाकरी स्पर्धा | विद्यार्थी व शिक्षक |
| ९. | २६/०१/२०२२ | बक्षिस वितरण | विद्यार्थी, ग्रामस्थ व मान्यवर |
| १०. | ०६/०४/२०२२ | विद्यार्थ्यांची शैक्षणिक उत्तर चाचणी | स्थलांतर थांबलेले विद्यार्थी |

## ७. उपक्रमासाठी इतरांची मदत

सदर उपक्रमासाठी सांगलीचे जिल्हाधिकारी डॉक्टर श्री. अभिजीत चौधरी, जतचे प्रांताधिकारी श्री. जोगेंद्र कट्यारे, तहसीलदार श्री. जीवन बनसोडे, गट विकास अधिकारी श्री. खरात साहेब, गटशिक्षणाधिकारी श्री. साळुंखे साहेब त्याचप्रमाणे अंगणवाडी सेविका तूपसौंदर्य मॅडम व इरकर मॅडम, कुलाळवाडीतील खंडोबा व बिरोबा देवस्थान समिती, ग्रामपंचायत कार्यालय कुलाळवाडी यांची मदत मिळाली.

## ८. सादर करावयाचे पुरावे

१) पालक सभा,  विद्यार्थी पूर्व तयारी, भाकरी स्पर्धा, बक्षिस वितरण फोटो.

२) पालक प्रश्नावली

३) विद्यार्थी पूर्व चाचणी

४) भाकरी स्पर्धा गुणपत्रक

५) विद्यार्थी उत्तर चाचणी

६) पालक अभिप्राय

# नवोपक्रमाची कार्यपद्धती



पालक सभा



पालकांच्या मार्गदर्शना स्पर्धेची तयारी करतना विद्यार्थी



भाकरी स्पर्धा



**स्पर्धेत विद्यार्थ्यानी बनविलेल्या भाकरी**



**विद्यार्थांचे  भाकरी बनविण्याचे  कौशल्य न्याहाळताना जिल्हाधिकारी चौधरी साहेब.**



**भाकरी स्पर्धा बक्षिस वितरण**

# १) पूर्वस्थितीची निरीक्षणे व त्याच्या नोंदी:

माझी भाकरी हा उपक्रम राबवण्यापूर्वी पालकांसोबत विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणावर हंगामी स्थलांतर होत असायचे. ३३% हून अधिक विद्यार्थी यामुळे शिक्षणापासून वंचित राहायचे. हे सर्व विद्यार्थी शाळाबाह्य ठरायचे यामुळे त्यांच्या पुढील आयुष्यात ही अडथळे निर्माण व्हायचे.

१.१ ) विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती खुंटायची.

१.२ ) विद्यार्थ्यांच्या मनात न्यूनगंड निर्माण व्हायचा.

१.३ ) उपस्थित व अनुपस्थित विद्यार्थी यांच्यामध्ये मोठी शैक्षणिक दरी निर्माण व्हायची.

१.४ ) भटकंतीमुळे विद्यार्थ्यांच्या कुपोषणाची व आरोग्याची गंभीर समस्या निर्माण व्हायची.

१.५ ) विद्यार्थ्यांच्या अनुपस्थितीमुळे शाळेत शैक्षणिक उपक्रम राबविताना मर्यादा यायच्या.

१.६ ) बालविवाह व बालमजुरी या समस्या निर्माण व्हायच्या.

१.७ ) विद्यार्थी इयत्ता आठवी पूर्वीच शिक्षण सोडत असत.

## २) कार्यवाही दरम्यान निरीक्षणे व माहितीचे संकलन

उपक्रमा दरम्यान विद्यार्थी व पालकांमध्ये कुतूहल व चैतन्य निर्माण झाले.

२.१ ) स्वत:च्या स्थलांतरामुळे पाल्यांचे होणारे शारीरिक व शैक्षणिक नुकसान यामुळे पालक नेहमीच चिंतातूर असायचे. माझी भाकरी या उपक्रमामुळे पालकांना पाल्यांना घरी ठेवून रोजगारासाठी जाता येईल असा आशेचा किरण दिसू लागला.

२.२) स्पर्धेत क्रमांक मिळावा यासाठी विद्यार्थी भाकरी बनवायचा प्रयत्न करू लागले. आई आजी तसेच घरातील महिलांना विद्यार्थी भाकरी बनवायला शिकवण्याची विनंती करू लागले.

२.३ ) विद्यार्थी भाकरी बनविण्याचा सराव करताना घरात स्वतः बनविलेल्या भाकरी, इतर विद्यार्थ्यांना दाखवू लागले. ते बघून इतर विद्यार्थ्यां प्रेरित होऊ लागले.

२.४ ) शाळेत भाकरी बनविण्याच्या प्रात्यक्षिकात विद्यार्थी उत्साहाने सहभागी होऊ लागले. विद्यार्थ्यांमध्ये कुतूहल व जिज्ञासा दिसू लागली.

२.५ ) विशेष म्हणजे विद्यार्थी शाळेतील विद्यार्थिनींकडून भाकरी बनविण्या संदर्भात मार्गदर्शन घेऊ लागले. विद्यार्थ्यांमध्ये आनंद निर्माण होऊ लागला.

२.६ ) पालक शिक्षण व शाळेकडे सकारात्मक दृष्टीने पाहू लागले. पालक शिक्षकांसोबत स्वतःहून संवाद, चर्चा करायला लागले.

## **३) उपक्रम पूर्ण झाल्यावर केलेली निरीक्षणे व त्याच्या नोंदी**

उपक्रम पूर्ण झाल्यानंतर असे लक्षात आले की विद्यार्थ्यांचे हंगामी स्थलांतर १००% थांबले आहे. विद्यार्थ्यांच्या स्थलांतरा मागील प्रमुख कारण म्हणजे भाकरीची अर्थात जेवणाची सोय याचे निर्मूलन करण्यात हा उपक्रम पूर्णतः यशस्वी झाला. पालक आत्मविश्वासाने विद्यार्थ्यांना घरी ठेवून रोजगार कमविण्यासाठी जाऊ लागले. काही महत्वपूर्ण निरीक्षणे पुढील प्रमाणे:

३.१) विद्यार्थ्यांची शाळेतील उपस्थिती 95 % पर्यंत वाढली.

३.२) शैक्षणिक तसेच सह शैक्षणिक उपक्रमांमध्ये विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी होऊ लागले.

३.३) वक्तृत्व, कथाकथन, एकांकिका, स्टोरी टेलिंग, इंग्लिश लैंग्वेज कॉम्पिटिशन तसेच मैदानी स्पर्धांमध्ये विद्यार्थ्यांनी जिल्हा स्तरापर्यंत मजल मारली.

३.४) स्त्री – पुरुष समानता, समस्या निराकरण, नीटनेटकेपणा, श्रमप्रतिष्ठा ही मूल्ये विद्यार्थ्यांच्या मनामध्ये रुजली.

३.५) आई-वडिलांच्या अनुपस्थितीत विद्यार्थी घरातील इतर जबाबदाऱ्या जसे की बाजार करणे, घर सांभाळणे, स्वतःच्या आरोग्याची काळजी घेणे, वृक्षसंवर्धन , शेतीतील छोटी मोठी कामे पार पाडायला लागले.

३.६) विद्यार्थ्यांचे आरोग्य सुधारले तसेच मानसिक दृष्ट्या विद्यार्थी कणखर बनले

३.७) विद्यार्थ्यांमध्ये सहकार्य तसेच संघ भावना निर्माण होऊ लागली

३.८) काही विद्यार्थ्यांनी आई-वडिलांच्या अनुपस्थितीत स्वतःचे व्यवसाय उभे करत आई-वडिलांची ऊस तोडीच थांबवली.

**४. कार्यवाहीत आलेल्या अडचणी:**

माझी भाकरी नवोपक्रम राबवीत असताना खालील अडचणी देखील आल्या.

४.१ ) आपल्या पुरुषप्रधान संस्कृतीत भाकरी किंवा स्वयंपाक करणे हे स्त्रियांचे काम समजले जाते. त्यामुळे भाकरी बनविण्यासाठी विद्यार्थी आणि पालकांची सकारात्मक मानसिकता निर्माण करावी लागली.

४.२ ) सुरुवातीला भाकरी बनविण्याचा सराव करताना विद्यार्थ्यांकडून पिठाची नासाडी होई. चूल किंवा गॅसवर विद्यार्थी भाकरी बनवीत असताना त्यांना इजा होणार नाही याची कटाक्षाने दक्षता घ्यावी लागे.

४.३ ) शाळेत प्रात्याक्षिके घेत असताना साहित्याची अडचण निर्माण व्हायची.

४.४) सर्वच विद्यार्थी स्पर्धेमध्ये सहभागी होऊ लागल्याने स्पर्धा घेण्यासाठी अधिक वेळ द्यावा लागला.

४.५ ) विजेत्या विद्यार्थ्यांना बक्षीसे देण्यासाठी आर्थिक अडचणी आल्या.


आमच्या दृढनिश्चयामुळे या सर्व अडचणींतून मार्ग काढून, त्यावर मात करून आम्ही यशस्वी झाला आहोत.

## ५) माहितीचे विश्लेषण

विद्यार्थी पूर्वचाचणी व उत्तर चाचणी मधील गुणात्मक फरक

| गुण | इयत्ता ३ री विद्यार्थी संख्या | | इयत्ता ४ थी विद्यार्थी संख्या | | इयत्ता ५ वी विद्यार्थी संख्या | | इयत्ता ६ वी विद्यार्थी संख्या | | इयत्ता ७ वी विद्यार्थी संख्या | | इयत्ता ८ वी विद्यार्थी संख्या | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी | पूर्व चाचणी | उत्तर चाचणी |
| ०-५ | ५ | २ | ४ | १ | ४ | १ | ४ | १ | ३ | २ | ३ | १ |
| ६-१० | २ | ३ | ३ | ४ | ३ | ४ | २ | ४ | ३ | २ | ४ | ५ |
| ११-१५ | १ | २ | १ | २ | २ | २ | ३ | २ | २ | ३ | २ | १ |
| १६-२० | ० | १ | ० | १ | ० | २ | ० | २ | ० | १ | ० | २ |

# स्थलांतर करणारे विद्यार्थी



# नवोपक्रमाची यशस्विता /फल निष्पत्ती

सदर नवोपक्रमातून खालील प्रमाणे यश मिळविता आले

**उद्दिष्ट क्र.१. स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या समस्यांचा शोध घेणे हे सफल झाले,**

स्थलांतर करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या

१.१) भटकंती,

१.२) कुपोषण

१.३) बालमजुरी

१.४) आरोग्य इत्यादी समस्यांचा शोध घेता आला.

**उद्दिष्ट क्र.२. विद्यार्थ्यांच्या समस्यांवर उपाययोजनांसाठी उपक्रमांची निर्मिती करणे हे यशस्वी झाले**

२.१) पालक भेटी

२.२) माता पालकांशी संवाद

२.३) सामाजिक संस्था व तज्ञ व्यक्तींशी चर्चा

२.४) भाकरीची स्पर्धा इत्यादी उपक्रम यशस्वीरित्या राबविता आले.

**उद्दिष्ट क्र ३ विद्यार्थ्यांना स्वावलंबी बनविणे, हे सफल झाले**

उपक्रमाच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थ्यांमध्ये स्वावलंबनाविषयी खालील बदल दिसून आले

३.१) वक्तशीरपणा

३.२) नीटनेटकेपणा

३.३) श्रमप्रतिष्ठा

३.४) स्व ची जाणीव

३.५) भाकरी बनविण्याचे व स्वतःची इतर कामे स्वतः करण्याचे कौशल्य

**<u>उद्दिष्ट क्र.४. विद्यार्थ्यांचे स्थलांतर थांबविणे व उपस्थिती वाढविणे, हे यशस्वी झाले.</u>**

प्रतिवर्षी ऑक्टोबर महिन्यानंतर शाळेतील सुमारे ७० म्हणजे ३३ टक्के विद्यार्थ्यांचे हंगामी स्थलांतर व्हायचे. उपक्रमाच्या अंमलबजावणीनंतर विद्यार्थ्यांचे स्थलांतर पूर्णपणे थांबून उपस्थिती ९५ टक्क्यांपर्यंत वाढली. यावरून वरील उद्दिष्ट साध्य झाले हे दिसून येते.

**<u>उद्दिष्ट क्र. ५ विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता वाढविणे, हे सफल झाले.</u>**

विद्यार्थ्यांच्या पूर्व  व उत्तर चाचणी गुणातील सकारात्मक फरक या उपक्रमामुळे दिसून आला.

शैक्षणिक गुणवत्तेत लक्षणीय वाढ होऊन विद्यार्थ्यांनी शैक्षणिक व सह शैक्षणिक स्पर्धांमध्ये यश मिळविले.

# समारोप

भाकरीची समस्या सोडविण्यासाठी सुरू केलेला प्रयोग, उपक्रम बनत दैनंदिन जीवनाचा अविभाज्य आणि आनंददायी भाग बनला. विद्यार्थ्यांचे स्थलांतर आणि गळती ही फार मोठी आणि गंभीर समस्या परंतु माझी भाकरी उपक्रमातून या समस्येवर शाश्वत आणि स्वावलंबी उपाय मिळाला आहे. विद्यार्थी दैनंदिन जीवनातील जबाबदाऱ्या पार पाडू लागल्याने त्यांचा भावनिक विकास होऊ लागला. ज्ञानरचनावादी पद्धतीने विद्यार्थ्यांचा शैक्षणिक विकास व त्यातून गुणवत्ता वाढ साध्य झाली. सर्वाधिक समाधानाची बाब म्हणजे माझी भाकरी या उपक्रमामुळे शिक्षणाच्या प्रवाहात टिकून राहिलेल्या विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करत स्वतःबरोबरच पालकांचे देखील स्थलांतर कायमचे थांबविले. शिक्षण म्हणजे समस्या निराकरण आणि स्वावलंबन याची प्रचिती देणारा हा उपक्रम इतरही ठिकाणी राबविला गेल्यास खूप फायदेशीर ठरू शकतो.

# सारांश

अन्नापासून सुरू होणाऱ्या मानवी मूलभूत गरजा टप्प्याटप्प्याने शिक्षणापर्यंत पोहोचतात. त्यामुळे 'अन्न ' या गरजेची पूर्तता झाल्याशिवाय शिक्षणाचा विचार म्हणजे केवळ स्वप्न! कुलाळवाडीही याला अपवाद नाही. दुष्काळ, दारिद्र्य, असाक्षरता, दुर्बलता आणि होणारे स्थलांतर हे दृष्ट चक्र पिढ्यान पिढ्या सुरूच होते. यातून मार्ग काढण्याचे एक मात्र साधन म्हणजे शिक्षण आणि शिक्षण म्हणजे समस्या निराकरण. अन्नाची समस्या सोडविल्यास इतर समस्या सुटतील आणि अपेक्षित ध्येय गाठता येईल, या विचारातून जि. प. प्रा. कुलाळवाडी शाळेत 'माझी भाकरी' हा उपक्रम सुरू केला. अन्नाची समस्या सोडविण्यासोबतच स्त्री-पुरुष समानता, श्रमप्रतिष्ठा, स्व ची जाणीव, भावना ,बुद्धी आणि कृती यांचा समन्वय, नीटनेटकेपणा यासारखी उद्दिष्टे देखील साध्य झाली.

# संदर्भ सूची


१) करंदीकर सुरेश(२००६)- अध्यापनाचे मानसशास्त्र(फडके प्रकाशन,कोल्हापूर)

२) बोरचाटे शिवाजी(२००५)-कृतीसंशोधन व नवोपक्रम (सुविचार प्रकाशन,पुणे)

३) जगताप ह.ना.- शैक्षणिक मूल्यमापन (फडके प्रकाशन ,कोल्हापूर)

४) कदम. चा.प.- शैक्षणिक मूल्यमापन व संख्याशाश्र (नूतन प्रकाशन,पुणे)

५) बापट.भा. गो.(१९८४)-शैक्षणिक कृतीसंशोधन(नूतन प्रकाशन,पुणे)

६) दांडेकर रेणू(२००५)-शिक्षणातील चांगले काही(प्रफुल्लत प्रकाशन,पुणे

# परिशिष्टे

**मिडिया लिंक**

1) https://www.facebook.com/watch/?extid=NS-UNK-UNK-UNK-IOS_GK0T-GK1C&v=595730935352819

2) https://www.youtube.com/watch?v=cQJgxqECGEI

3) https://www.facebook.com/watch/?extid=WA-UNK-UNK-UNK-AN_GK0T-GK1C-GK2C&v=576537570688253

## ४) सहभागी विद्यार्थी यादी

**इयत्ता 3 री**

१) कारंडे तुकाराम प्रकाश
२) करपे एकनाथ दशरथ
३) कुळाल शरद संजय
४) गुळदगड सौरभ सोपान
५) इरकर मयूर रामू
६) मोरे नरेंद्र प्रकाश
७) वाघमोडे पृथ्वीराज ईश्वर
८) धडस सुनील सतु
९) टकले अनिल धोंडीराम
१०) पडोळकर अनिकेत कृष्णा
११) तांबे संग्रामसिह भरमा
१२) गुळदगड निवास सोमा

**इयत्ता ४ थी**

१) सचिन राजाराम कुलाल
२) प्रवीण शहाजी कुलाल
३) प्रवीण बिरुदेव लोखंडे
४) यशराज मल्लाप्पा कांबळे
५) प्रवीण सिध्दप्पा कोकरे
६) बनाजी जयवंत गुळदगड
७) बिरुदेव भरमा तांबे
८) राहुल श्रीशैल कोलकार
९) किरण मधुकर माने
१०) हिराचंद वाघोबा डोंबळ
११) मानतेश मल्लाप्पा माळी
१२) प्रतीक परशुराम कोरे

**इयत्ता ५ वी**

१) जयदीप महादेव माने
२) संतोष सुरेश सरगर
३) जयवंत वसंत लोखंडे
४) हर्षवर्धन महादेव कोकरे
५) सागर राजाराम इरकर
६) सोमनाथ दशरथ करपे
७) मल्हारी वसंत तांबे
८) सुदर्शन अंकुश कुलाल
९) निखिल सतु कुलाल
१०) सुजित सोमनाथ लोखंडे
११) शंभू हंबीरराव ताटे

**इयत्ता ६ वी**

१) कुलाल सागर महादेव
२) टेंगले अजित शामराव
३) तूपसौंदर्य विशाल अंकुश
४) कुलाल शुभाष सिध्दप्पा
५) धडस यशवंतराव काशिनाथ
६) टकले सचिन बयाजी
७) गुळदगड रविराज बाळासाहेब
८) इरकर सुशांत बाळासाहेब
९) कोकरे रोहित उत्तम
१०) पडोलकर काशीनाथ कृष्णा
११) कोकरे अनिकेत चांगप्पा
१२) कुलाल प्रशांत शहाजी
१३) माळी महेश मल्लप्पा
१४) कुलाळ अरुण संजय
१५) गुळदगड मानतेश कामु

## इयत्ता ७ वी

१)सुशांत भिवा कुलाळ
२)महादेव कृष्णा कोकरे
३)विशाल वसंत लोखंडे
४)सुशांत नामदेव टेंगले
५)अप्पासो विलास गुळदगड
६)कोंडीब राजाराम गुळदगड
७)निवास संजय इरकर
८)लक्ष्मण मायप्पा लोखंडे
९)रोहित बाळासाहेब गुळदगड
१०)सुमित हणमंत भिसे
११)मारुती महादेव नेमाने
१२)वैभव कामु धडस
1३)हणमंत श्रीशैल कोरे
१४)राहुल जोतिबा माने
१५)सुशांत मारुती कुलाल
१६)नितीन सिद्धप्पा कोकरे

## इयत्ता ८ वी

१) संचित संजय इरकर
२)अक्षय बयाजी टकले
३) गुणवंत बसराज गुळदगड
४)बाळासो सीताराम ठोंबरे
४)तानाजी सुखदेव कोकरे
५)कार्तिक महादेव माने
६)करण ज्ञानेश्वर डोंबाळे
७)वैभव धोंडिबा इरकर
८)संदीप शिवाजी टकले
९)अमोल तानाजी गुळदगड
१०)तुषार अंकुश तूपसौंदर्य
११)सीताराम चिंतामणी कोरे
१२)पवन जयवंत वगरे
१३)राहुल कामु गुळदगड
१४)संतोष यशवंत टकले
१५) भिवाजी संभाजी कोकरे
१६)काशीनाथ गुंडा लोखंडे
१७)भारत धोंडिबा लोखंडे
१८)ओंकार विलास माने

**५) पालक प्रश्नावली**

पालकाचे नाव : मो. क्र-

पाल्याचे नाव : इयत्ता-

१) तुम्ही उसतोडीला गेल्यावर पाल्याला घरी ठेवून जाऊ शकता का?
**हो** **नाही**

२) आजी किंवा इतर नातेवाईकांकडे पाल्याला राहण्याची व्यवस्था करू शकाल का?
**हो** **नाही**

३) पाल्याला उसतोडीला सोबत घेऊन गेल्यावर तिकडे शाळेत पाठविता का?
**हो** **नाही**

४) तिथे राहण्याची व्यवस्था कशी असते?
**हो** **नाही**

५) तिकडे पाल्य आजारी पडतात का?
**हो** **नाही**

६) आजारी पडल्यास वेळेवर उपचार मिळतात का?
**हो** **नाही**

७) वेळेवर जेवण देता का?
**हो** **नाही**

८) तुमच्यासोबतीने मुले मजुरी करतात का?
**हो** **नाही**

९) मुलींची लग्न केव्हा करता?

१०) राहण्याची व जेवण्याची सोया झाल्यास उसतोडीला जाताना तुम्ही पाल्याला घरी ठेवून जाणार का?

**हो** **नाही**

# ६) माझी भाकरी स्पर्धा

## जि.प.प्रा.शाळा कुलाळवाडी ता. जत जि.सांगली

## गुणपत्रक

इयत्ता                                                            दिनांक

| अ.क्र. | विध्यार्थ्याचे नाव | स्वच्छता १० | नीटनेटके पणा  १० | साहित्याची हाताळणी १० | आकार १० | चव १० | एकूण ५० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |
| | | | | | | | |

## ७) पूर्व व उत्तर चाचणी

इयत्ता ३ री व ४ थी

गुण २० वेळ ३० मी

1) तुझी आवडती कविता म्हण ?

२) पुढील वाक्यातील नाम ओळखून अधोरेखित कर.

'सविता रोज बागेतून फुले घेऊन येते'

३) तुझा आवडता खेळ कोणता ?

४) विरुद्धार्थी शब्द लिही. 'श्रीमंत'

५) म्हण पूर्ण कर.अति तेथे ........

६) sing a poem

७) पुढील शब्दात 'b' हे अक्षर रेषेने जोड

Bat, cab, banana, cub

८) what is your name?

९) write name of two animals?

१०) पुढीलपैकी खाद्य पदार्थ असलेल्या शब्दाला गोल कर.

Cat, rat, batl, tomato

११) बेरीज कर २२७+३५२

१२) वजाबाकी कर. ५५८-३२६

१३) पुढील पैकी सजीव कोण?

दगड,कुलूप,शेळी,खुर्ची,

१४) आईच्या भावाला काय म्हणतात?

१५) पुढीलपैकी पाण्याचा नैसर्गिक स्रोत कोणता?

टाकी,फिल्टर,नदी,हौद

१६) महाराष्ट्राचे मुख्यमंत्री कोण आहेत?

१७)आपल्या जिल्ह्यात एकूण किती तालुके आहेत?

१८)स्पर्शाचे ज्ञान कोणत्या ज्ञानेद्रियाद्वारे होते?

१९)सूर्य कोणत्या दिशेला उगवतो?

२०)रमेशने पाच रुपयाचा पेन बारा रुपयांची वही व तीन रुपयाचे खोडरबर विकत घेतले तर त्याने दुकानदारास किती रुपये रक्कम द्यावी?

## ८) **पूर्व व उत्तर चाचणी**

इयत्ता ५ वी व ६  वी

गुण २० वेळ ३० मी

१) म्हण पूर्ण करा. बैल गेला नि............'

२) 'सावरपाडा' एक्सप्रेस कुणाला म्हणतात?

३) 'प्रामाणिक' या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द लिहा?

४) 'गी,ता,स्व, या अक्षरा पासून अर्थपूर्ण शब्द लिहा?

५) तुम्हारे गांव का नाम लिखो?

६) चमगादड को मराठी मे क्या कहते है?

७) मॉ के बहन को क्या कहते है?

८) what is your father name?

९) sing a poem?

10) write five name of animals?

11) इसवी सन कालगणना कोणत्या नावावरून सुरू झाली?

12) पृथ्वीवर सर्वात प्रथम कोणते सजीव अस्तित्वात आले?

१३) पृथ्वी कशाभोवती परिभ्रमण करते?

१४ नकाशावर कोणत्या दिशेचा उल्लेख असतो?

१५) गावाच्या प्रमुखास काय म्हणतात?

१६) कोणाचे प्रकार किती?

१७) सम संख्या म्हणजे काय?

१८) पुढील संख्येचा वर्ग किती-१२

19) १७२ या संख्येत ७ ची स्थानिक किंमत किती?

20) पुढील आकृती चे नाव लिही -$\Delta$

## ९) पूर्व व उत्तर चाचणी

इयत्ता ७ वी व ८ वी

गुण २० वेळ ३०

१) कर नाही त्याला डर कशाचा.वाक्यात उपयोग करा?

२) आगंतुक या शब्दाचा विरुद्धार्थी शब्द सांगा?

३) राम आंबा खातो.या वाक्यात कोणत्या विरामचि न्हाचा वापर केला आहे?

४) राम मैदानात जोरात पळाला.या वाक्यातील क्रिया विशेषण कोणते?

५) डॉ.ए. पी.जे.अब्दुल कलाम यांचे संपूर्ण नाव काय?

६) ५/१०,अपूर्णकांचे वाचन करा?

७) २,५,४,७,यातील विषम संख्या ओळखा?

८) चौकोणाचे प्रकार किती?

9) एका तासामध्ये किती सेकंड असतात?

10) 150×26 वरील गुणाकार करा?

11) सजीवांची लक्षणे सांग?

13) तुमच्या परिसरातील वनस्पतींची नावे सांगा?

14) तुमच्या घराशेजारी आग लागल्यास काय कराल?

१५) अन्न भेसळ म्हणजे काय?

१६) सांगली जिल्ह्यातील ऐतिहासिक स्थळांची नावे सांगा?

१७) आपल्या प्रदेशात कोणत्या प्रकारची मृदा आढळते?

१८) ऋतूंची निर्मिती का होते?

१९) महाराष्ट्राच्या मुख्यमंत्र्यांचे नाव सांगा?

२०) लोकशाही म्हणजे काय?

# पालकांचे अभिप्राय

'माझी भाकरी' हा उपक्रम गावातील विद्यार्थ्यांसाठी खूपच महत्त्वपूर्ण आहे. यामुळे विद्यार्थी आई-वडीलांसोबत ऊसतोडीला जात नाहीत. नेहमी शाळेत उपस्थित राहतात. शाळेतील शिक्षकांनी आम्हा सर्वांना विश्वासात घेऊन हा उपक्रम राबविला. इतरही शाळांमध्ये हा उपक्रम राबविला जावा.

Y.D.N.
सरपंच कुसाळवाडी
सौ. येसाबाई धुळा नेमाळे

'आमची मुलं भाकरी बनवतात व आम्हालाही खायला देतात. आम्हाला मुलांचं खूप कौतुक वाटतं. आता मुलं आमच्यासोबत ऊसतोडीला येत नाहीत. घरीच राहून शाळेत जातात. आमच्यासारखे कष्ट हाल होऊ नयेत म्हणून आम्ही धडपडत आहोत.'

Bh
श्री. अरमा श्रीमंत तांबे
पालक.